| MHKO140000432026 | **फौजदारी किरकोळ अर्ज क्र.३/२०२६**<br>श्री. दीपक बाबु लाडलक्ष्मीकर<br>**वि.**<br>महाराष्ट्र सरकारतर्फे,<br>विशेष सरकारी वकील, चंदगड,<br>ता. चंदगड, जि. कोल्हापूर. |
|---|---|

## निशाणी क्र.१ खालील आदेश
## (दिनांक–०३/०२/२०२६)

१. प्रस्तुत अर्ज अर्जदार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ४९७ अन्वये अंतरिम ताबा मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, चंदगड पोलिस ठाणे, चंदगड येथे दाखल गु.रजि.क्र.३२३/२०२५, बी. एन. एस. एस. कायदा २०२३ कलम ३०३(२), ३(५) अन्वये दाखल गुन्ह्याच्या तपासादरम्यान चंदगड पोलिस ठाण्याच्या पोलिसांनी अर्जदार यांच्या मालकीची वाहनाचा प्रकार– मोटरसायकल/स्कुटर, कंपनी– हिरो मोटोकॉर्प लि., मॉडेल– SPLENDOR+(DRS), रजिस्ट्रेशन नं.MH–09–GY–1614, इंजिन नं.HA11E8S5B2 7472, चेसीस नं.MBLHAW23XSSB51527 असुन त्यास (पुढे सदर वाहनास <u>जप्त वाहन</u> असे संबोधण्यात येत आहे) जप्त केले आहे. सदर गुन्हयाची तपासणी होवून दोषारोपपत्र दाखल करुन सदर केस गुणदोषावर चालणेस बराचसा कालावधी लागणार आहे. सदरची दुचाकी वाहन हे चंदगड पोलिस ठाणे यांचे कार्यालयाचे आवारात आहे. सदरचे दुचाकी वाहन हे अर्जदार यांनी आपल्या वैयक्तिक व कौटुंबिक वापराकरिता खरेदी केलेले आहे. सदरच्या दुचाकी वाहना व्यतिरिक्त अर्जदार यांना त्यांचे कौटुंबिक व दैनंदिन वापरासाठी अन्य कोणतेही वाहन नाही. सदरचे वाहन पोलिस ठाणे येथे राहिलेस वाहनाला गंज येणार आहे, त्याच्या इंजिनमध्ये दोष निर्माण होणार आहे. तसेच त्या दुचाकी वाहनाचे काही भाग तुटून पडण्याची किंवा खराब होण्याची दाट शक्यता आहे. तसेच ऊन, वारा व अवकाळी पडणा–या पावसामुळे त्यांची वरचेवर साफसफाई न केलेस सदर दुचाकी वाहनाची बॉडी खराब होणार आहे. अशा

परिस्थितीत सदरचे दुचाकी वाहन चंदगड पोलिस ठाणे, चंदगड येथे पडून राहिलेस अर्जदार यांचे कधीही व कशानेही भरुन न येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे. त्यामुळे वर नमूद सदर मोटारसायकल वाहनाचा ताबा अर्जदार यांना मिळणे आवश्यक आहे. अर्जदार सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यास तयार आहे. तसेच अटी घालून अर्जदार यांचे ताबेत दिलेस अर्जदार हे सदरचे दुचाकी वाहन कोणासही कोणत्याही प्रकारे विक्री किंवा तबदील करणार नाहीत. तसेच कोणासही कोणत्याही मार्गाने हस्तांतरीत करणार नाहीत व सदरचे वाहनाच्या स्वरुपात कोणताही बदल करणार नाहीत. त्यामुळे वाहनाचा अंतरिम ताबा मिळणे आवश्यक आहे. करिता प्रस्तुतचा अर्ज.

३. तपास अधिकारी यांना पुरेशी संधी असुनही लेखी म्हणणे सादर केले नाही. त्यामुळे प्रकरण त्यांच्याविरुध्द विना लेखी म्हणणे चालविण्यात आले आहे. तसेच सुविद्य सहा. सरकारी अभियोक्ता यांनी नि.क्र.१ वर त्यांचे लेखी म्हणणे सादर करून अर्जास विरोध दर्शविला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, अर्जदार याने गुन्हात वापरलेली दुचाकी परत देण्यात येऊ नये. यातील अर्जदार हे गु.र.न.३२३/२०२५ मध्ये आरोपी नं.१ असून त्यांनी त्यांच्यावर B.N.S.S. 2025 प्रमाणे 303(2), 3(5) प्रमाणे दाखल असून सदर गुन्हा हा Cognizable व Non-bailable आहे. सदरचा मुद्देमाल परत केल्यास पुन्हा अशाच प्रकारचा गुन्हा करण्याची शक्यता असून सदर मुद्देमाल चौकशीवेळी लागणार असून यातील अर्जदार यांना परत दिल्यास त्याच्या स्वरुपात बदल किंवा विक्री करण्याची दाट शक्यता नाकारता येणार नाही, त्यामुळे त्यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अर्जासोबत अर्जदार यांनी त्यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. तसेच जप्त वाहन त्यांच्या मालकीची आहे हे दर्शविण्यासाठी एफ.आय.आर.क्र.३२३/२०२५ ची मुळ प्रत, आर.सी. बुकची प्रत, विमाची कागदपत्रे, अर्जदाराचे आधारकार्डची झेरॉक्स प्रत दाखल केलेले आहेत. नोंदणीपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जप्त वाहन हे अर्जदार यांच्या मालकीचे आहे. अर्जदाराव्यतिरिक्त इतर कोणीही जप्त वाहनांच्या ताब्याची मागणी केलेली नाही. दाखल दस्तावरुन अर्जामध्ये नमूद केलेली वाहन हे अर्जदाराचे ताब्यातील असल्याचे दिसुन येते. परंतु

प्रथम खबर दिनांक १८/१२/२०२५ रोजी नोंदविल्याचे दिसून येते. ब–याच कालावधीपासून जप्त वाहन हे पोलिसांच्या ताब्यात असल्याचे दिसून येते. त्याकारणामुळे जप्त वाहन चंदगड पोलिस ठाणे, चंदगड यांच्या ताब्यात राहिल्यास वाहनांचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे अंतरिम ताबा अर्जदारास देणे योग्य राहील. सबब खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) गैरअर्जदार /तपास अधिकारी यांनी अर्जदारास स्कुटर, कंपनी– हिरो मोटोकॉर्प लि., मॉडेल–SPLENDOR+(DRS), रजिस्ट्रेशन नं.MH–09–GY–1614, इंजिन नं.HA11E8S5B27472, चेसीस नं.MBLHAW23XSSB51527 चा ताबा खालील अटींवर द्यावा.

३) अर्जदार यांनी वाहनांकरिता रक्कम रुपये ५०,०००/– चा सुपूर्तनामा हमीपत्र/ indemnity bond लिहून द्यावा.

४) अर्जदाराने पुढील आदेशापर्यंत अथवा न्यायालयाच्या परवानगी शिवाय जप्त दुचाकी वाहन विकू नये, अथवा त्याच्या मुळ स्वरुपात बदल करू नये.

५) तपासी अधिकारी यांनी जप्त वाहनांचा ताबा देण्यापूर्वी आवश्यक पंचनामा करावा आणि पंचनाम्यावर चेसीस प्रिंट घेवून वाहनाचे रंगीत फोटो घ्यावे आणि सर्व दस्त अंतिम अहवालासोबत सादर करावे.

६) उपरोक्त अटींचे अर्जदाराने भंग केल्यास बंधपत्रातील रक्कम वसुल करुन शासन जमा करण्यात येईल.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by WAMAN DIGAMBAR JADHAV
Date: 2026.03.23 13:47:04 +0530

**दिनांक ०३/०२/२०२६** **(वामन दि.जाधव)**

**चंदगड** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (कोर्ट क्र.२)**

**चंदगड.**